# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026


Original Article

## उत्तरपत्रिकांचे ऑन स्क्रीन मूल्यांकन करतांना परीक्षकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास


**रणजित कारभारी आहिरे[1] , डॉ. सज्जन शंकरराव थूल[2]**

[1]शैक्षणिक संयोजक, मूल्यमापन विभाग, (य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक)

[2]संचालक, मूल्यमापन विभाग, (य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक)

**Email:** vasuraj2609@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2026-180308

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 3(A)

Pp. 40-44

March- 2026

**Submitted:** 15 Feb. 2026

**Revised:** 25 Feb. 2026

**Accepted:** 10 Mar. 2026

**Published:** 31 Mar. 2026



***सारांश***

*शैक्षणिक मूल्यांकन प्रक्रियेत उत्तरपत्रिका तपासणी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश परीक्षक आणि समीक्षकांना उत्तरपत्रिका तपासणीदरम्यान येणाऱ्या अडचणींचा सखोल अभ्यास करणे हा आहे. या अभ्यासासाठी २११ प्रतिसादांचा प्राथमिक डेटा वापरण्यात आला आहे. संशोधनात तांत्रिक अडचणी, कार्यपरिस्थिती, उत्तरपत्रिकेची गुणवत्ता, मानधन, मानसिक स्थिती आणि डिजिटल मूल्यांकन प्रणाली यांचा विचार करण्यात आला आहे. निष्कर्षानुसार अशुद्धलेखन, अस्पष्ट हस्ताक्षर, इंटरनेट समस्या, अपूर्ण स्कॅनिंग, मानधनातील विलंब आणि मानसिक ताण या प्रमुख अडचणी आढळल्या. संशोधनातून असे दिसून आले की प्रशिक्षण, तांत्रिक सुविधा सुधारणा आणि प्रशासकीय व्यवस्थापन सुधारल्यास मूल्यांकनाची गुणवत्ता आणि पारदर्शकता वाढविता येईल.*



***मुख्यशब्द :*** *उत्तरपत्रिका तपासणी, परीक्षक, अडचणी, ऑन स्क्रीन असेसमेंट, तांत्रिक समस्या,*


### प्रास्ताविक

शिक्षण व्यवस्थेमध्ये मूल्यांकन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्ये आणि आकलनाचे मूल्यमापन करण्यासाठी उत्तरपत्रिका तपासणीची प्रक्रिया अत्यंत संवेदनशील आणि जबाबदारीची असते. पारंपरिक पद्धतीपासून आधुनिक संगणकाधारित मूल्यांकन प्रणालीकडे संक्रमण होत असताना परीक्षक व समीक्षकांना अनेक नवीन अडचणींचा सामना करावा लागतो. उदाहरणार्थ, प्रशासकीय, तांत्रिक समस्या, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, अस्पष्ट स्कॅनिंग, आणि मानसिक ताण होत असतो. विशेषतः ऑन स्क्रीन असेसमेंट पद्धतीमुळे मूल्यांकनाची गती वाढली असली तरी मूल्यांकन प्रक्रियेवर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन परीक्षक व समीक्षकांच्या या अडचणींचा सखोल अभ्यास करते.

### संशोधनाची गरज व महत्व

शैक्षणिक व्यवस्थेमध्ये मूल्यांकन प्रक्रिया ही विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्ये, वृत्ती आणि प्रगतीचे अचूक प्रतिबिंब दर्शवणारी अत्यंत महत्त्वाची कडी आहे. उत्तरपत्रिका तपासणी ही या प्रक्रियेतील केंद्रबिंदू असून तिच्या गुणवत्तेवर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता अवलंबून असते. उत्तरपत्रिका तपासताना जर परीक्षकांना तांत्रिक, मानसिक किंवा कार्यपरिस्थितीशी संबंधित अडचणी येत असतील, तर त्याचा थेट परिणाम मुल्यांकनाच्या अचूकतेवर होतो. प्रस्तुत संशोधनाची गरज आणि महत्व पुढील मुद्द्यांद्वारे सविस्तरपणे स्पष्ट करता येते.

**१ गुणवत्तापूर्ण मूल्यांकन सुनिश्चित करणे:** प्रस्तुत अभ्यासाद्वारे अशा अडचणींची ओळख करून त्यावर उपाययोजना सुचविणे शक्य होते. यामुळे मूल्यांकन प्रक्रियेत एकवाक्यता वस्तुनिष्ठता आणि विश्वासार्हता वाढवता येते. गुणवत्तापूर्ण मूल्यांकन ही शिक्षण व्यवस्थेची मूलभूत गरज आहे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*रणजित कारभारी आहिरे, शैक्षणिक संयोजक, मूल्यमापन विभाग, (य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक)*



**How to cite this article:**

*आहिरे, . रणजित. कारभारी., & थूल, . सज्जन. शंकरराव. (2026). उत्तरपत्रिकांचे ऑन स्क्रीन मूल्यांकन करतांना परीक्षकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास. Journal of Research & Development, 18(3(A)), 40–44. https://doi.org/10.5281/zenodo.19607028*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.19607028

OPEN ACCESS

**२. विद्यार्थ्यांच्या निकालातील अचूकता वाढविणे:** विद्यार्थ्यांचा निकाल हा त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीचा पाया असतो. जर उत्तरपत्रिका तपासणीमध्ये त्रुटी राहिल्या, तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे चुकीचे मूल्यमापन होण्याची शक्यता असते. अशुद्धलेखन, अस्पष्ट हस्ताक्षर, अपूर्ण स्कॅनिंग यांसारख्या अडचणींमुळे परीक्षक योग्य प्रकारे गुणांकन करू शकत नाहीत. या संशोधनामुळे अशा घटकांची ओळख होऊन योग्य उपाययोजना राबविता येतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या निकालातील अचूकता आणि न्याय्यता वाढते.

**३. डिजिटल मूल्यांकन प्रणालीतील त्रुटी ओळखणे:** आजच्या काळात विद्यापीठांमध्ये ऑन स्क्रीन असेसमेंट पद्धतीचा अवलंब केला आहे. या प्रणालीमुळे मूल्यांकनाची गती वाढली असली तरी इंटरनेट कनेक्टिव्हिटी, लॉगिन समस्या, स्कॅनिंग गुणवत्तेतील त्रुटी अशा अनेक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

**४. परीक्षकांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे:** परीक्षक आणि समिक्षकांची कार्यक्षमता ही मूल्यांकन प्रक्रियेची गुणवत्ता ठरवणारी महत्त्वाची बाब आहे. कामाचा ताण, वेळेची मर्यादा, कॅप केंद्रातील वातावरण, तसेच मानसिक व सामाजिक घटक यांचा परीक्षकांच्या कार्यक्षमतेवर मोठा प्रभाव पडतो. या संशोधनाद्वारे परीक्षक आणि समीक्षकांना येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन प्रशिक्षण कार्यक्रम, सुविधा सुधारणा आणि कार्यपद्धतीतील बदल सुचविता येतात. यामुळे परीक्षक आणि समीक्षक अधिक कार्यक्षम, संतुलित आणि निष्पक्ष पद्धतीने मूल्यांकन करू शकतात.

**५. शैक्षणिक धोरणनिर्मितीस मदत करणे:** कोणत्याही शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वास्तवाधारित माहिती आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनातून मिळणारी माहिती विद्यापीठे, परीक्षा मंडळे आणि धोरणनिर्माते यांना उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ, मानधनातील विलंब, तांत्रिक अडचणी किंवा प्रशिक्षणाची गरज या बाबी लक्षात घेऊन नवीन धोरणे आखता येतात. यामुळे मूल्यांकन प्रणाली अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि विद्यार्थी-केंद्रित बनते.

**६. परीक्षकांच्या मानसिक आरोग्याचे महत्व अधोरेखित करणे:** उत्तरपत्रिका तपासणी ही मानसिकदृष्ट्या तणावपूर्ण प्रक्रिया असू शकते. दीर्घकाळ एकाच प्रकारचे काम, वेळेचा ताण आणि कार्यपरिस्थितीतील अडचणी यामुळे परीक्षकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. प्रस्तुत अभ्यासातून मानसिक घटकांचा प्रभाव स्पष्ट होतो, ज्यामुळे परीक्षकांसाठी मानसिक आरोग्य सहाय्य, विश्रांती व्यवस्था आणि संतुलित कार्यपद्धती विकसित करण्याची गरज अधोरेखित होते.

**७. कॅप केंद्रातील व्यवस्थापन सुधारणा:** कॅप केंद्रांमध्ये उपलब्ध सुविधा, वातावरण, तांत्रिक साधने आणि व्यवस्थापन यांचा परीक्षकांच्या कामावर थेट परिणाम होतो. या संशोधनामुळे कॅप केंद्रातील अडचणी (उदा. गोंधळ, सुविधा अभाव) ओळखून त्यात सुधारणा करता येतात. यामुळे कार्यक्षमता आणि कामाचा दर्जा वाढतो.

**८. प्रशिक्षण कार्यक्रमांच्या प्रभावीतेचे मूल्यमापन:** संशोधनातून असे दिसून येते की संक्षिप्त नमुना उत्तरे आणि प्रशिक्षण कार्यक्रम परीक्षकांच्या कामात एकवाक्यता आणण्यासाठी महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे अशा प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यांकन यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**संशोधन साहित्याचा आढावा**

शैक्षणिक मूल्यांकन प्रक्रियेवर विविध स्तरावर अनेक संशोधन झाले असून, या अभ्यासांमधून मूल्यांकनातील एकवाक्यता, डिजिटल मूल्यांकन, परीक्षक आणि समीक्षकांची मानसिक अवस्था आणि प्रशिक्षण यांसारख्या घटकांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संबंधित साहित्याचा सखोल आढावा खालीलप्रमाणे मांडता येतो. मूल्यांकनातील एकवाक्यता आणि मूल्यांकनातील सुसंगतता ही शैक्षणिक मूल्यांकनातील एक महत्त्वाची समस्या मानली जाते. (Paul Black आणि Dylan Wiliam (1998), यांनी त्यांच्या प्रसिद्ध अभ्यासात नमूद केले आहे की, मूल्यांकनातील असुसंगतता ही शिक्षणातील गुणवत्तेवर परिणाम करणारी प्रमुख समस्या आहे. त्यांनी formative assessment च्या माध्यमातून स्पष्ट निकष व सतत अभिप्राय यांचे महत्त्व अधोरेखित केले.

(Royce Sadler (1989) यांच्या संशोधनानुसार, जर मूल्यांकन निकष स्पष्ट नसतील, तर परीक्षकांच्या वैयक्तिक व्याख्यांमुळे गुणांकनात फरक पडतो. तसेच Gordon Stobart (2005) यांनी असे नमूद केले आहे की, मानकीकरणाच्या अभावामुळे परीक्षकांमध्ये निर्णय प्रक्रियेत फरक निर्माण होतो. डिजिटल मूल्यांकन प्रणालीमुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे, परंतु त्यासोबत काही तांत्रिक अडचणीही निर्माण झाल्या आहेत. (H. Douglas Brown (2004) यांच्या मतानुसार, संगणकाधारित मूल्यांकनामुळे मानवी त्रुटी कमी होतात आणि डेटा व्यवस्थापन सुलभ होते. David Boud (2000) यांनी डिजिटल मूल्यांकन प्रक्रियेतील सतत अभिप्रायाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. तथापि, JISC (2010) च्या अहवालानुसार, डिजिटल मूल्यांकनात तांत्रिक अडचणी, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, वापरकर्ता प्रशिक्षणाचा अभाव या समस्या दिसून येतात. Neil Selwyn (2016) यांनी डिजिटल शिक्षणातील असमानता आणि तांत्रिक अडचणींचा सखोल अभ्यास केला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

**परीक्षकांच्या मानसिक स्थितीचा प्रभाव** परीक्षकांची मानसिक आणि भावनिक अवस्था ही मूल्यांकनाच्या गुणवत्तेवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. Anthony Nitko आणि Susan Brookhart (2011) यांच्या मते, परीक्षकांची मानसिक अवस्था, थकवा आणि ताण यांचा निर्णय प्रक्रियेवर परिणाम होतो. Daniel Kahneman (2011) यांच्या Dual Process Theory नुसार, थकवा किंवा तणावाच्या परिस्थितीत निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. Mark Wilson (2005) यांनी असे दर्शविले आहे की, मूल्यांकन प्रक्रियेत मानवी घटकांचा प्रभाव टाळता येत नाही, त्यामुळे त्याचे व्यवस्थापन आवश्यक आहे.

**संशोधन अंतराल**

उपलब्ध साहित्याच्या आढाव्यातून असे दिसून येते की, उत्तरपत्रिका मूल्यांकन प्रक्रियेवर अनेक अभ्यास झाले असले तरी काही महत्त्वाच्या बाबींमध्ये स्पष्ट संशोधन पोकळी आढळते. विशेषतः ऑनस्क्रीन असेसमेंट प्रणालीतील परीक्षक समिक्षकांच्या प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित अभ्यास अत्यंत मर्यादित आहेत. याशिवाय, मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान परीक्षक समिक्षकांच्या मानसिक आरोग्याचा आणि तणावाचा परिणाम यावर पुरेसा अभ्यास झालेला नाही.

तसेच, परीक्षकांना मिळणाऱ्या मानधन आणि त्यांच्या कार्यप्रेरणा यांच्यातील संबंध याबाबतही सखोल संशोधन आढळत नाही. कॅप केंद्रातील सुविधा, कार्यपरिस्थिती आणि व्यवस्थापनातील त्रुटी यावर देखील मर्यादित माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे या सर्व घटकांचा एकत्रित अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधन या पोकळ्या भरून काढण्याचा प्रयत्न करत असून, मूल्यांकन प्रक्रियेतील वास्तविक अडचणी समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. उत्तरपत्रिका तपासणीदरम्यान येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
२. परीक्षक समीक्षकांच्या मूल्यांकन कार्यावर होणारा परिणामांचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती**

• प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.
• प्रस्तुत संशोधनाच्या माहिती संकलित करण्यासाठी २११ परीक्षकांचा हा नमुना आकार विचारात घेतला आहे.
• प्रस्तुत संशोधनाच्या माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरण्यात आले.
• प्रस्तुत संशोधनाच्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारीचा वापर केला आहे.

**संशोधनाची कार्यवाही**

संशोधनाच्या उद्दीष्टांनुसार प्रश्नावली तयार करण्यात आली. महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या २११ समंत्रकाकडून माहिती संकलित केली आहे. समंत्रक हेच परीक्षक आणि समीक्षक मूल्यांकनाचे काम करतात. प्रश्नावलीतील २६ प्रश्नाद्वारे अडचणींचा व त्यांच्या मूल्यांकनावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेतला आहे. या साधनाद्वारे माहिती संकलित केली आहे. माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

**संशोधनाचे निष्कर्ष**

१. उत्तरपुस्तिकेतील बहुभाषिक उत्तरे तपासतांना काही अडचणी भेडसावतात असे ८२.५ टक्के असे परीक्षकाचे मत आहे.
२. उत्तरपुस्तिका तपासण्याचे पत्र विभागीय केंद्रामार्फत देण्यात येते असल्याचे प्रमाण ८०.१० टक्के आहे तर नाहींचे प्रमाण १९.९० टक्के आढळून आले आहे.
३. परीक्षक समीक्षकांच्या उत्तरपुस्तिकेत अशुद्धलेखन असलेल्यांचे प्रमाण ५८.०८ टक्के समंत्रकाचे मत आढळून आले आहे.
४. परीक्षक समीक्षकांच्या उत्तरपुस्तिका अल्प मानधनाबाबत असलेल्यांचे प्रमाण अधिक (२६.१ %) आहे. उत्तरपुस्तिकेचे मानधन वेळेवर न मिळणाऱ्याचे असलेल्यांचे प्रमाण आढळून येते.
५. परीक्षक समीक्षकांच्या लॉगीन होत नसलेल्यांचे प्रमाण १४.०२ टक्के आहे. इंटरनेट कनेक्टीव्हिटी असलेल्यांचे प्रमाण ३१.३ टक्के संक्षिप्त नमुना उत्तरे न मिळणाऱ्यांचे प्रमाण ४.३ टक्के लक्षणीय प्रमाणात आढळतात.
६. उत्तरे तपासतेवेळी कॅप केंद्रातील इतर व्यक्तींच्या गोंधळामुळे तुमच्या कामावर परिणाम होत असलेल्यांचे प्रमाण १०.४ टक्के इतके आढळून आले आहे.
७. विद्यापीठाने पुरविलेल्या संक्षिप्त नमुना उत्तरामुळे तुमच्या उत्तर तपासणीच्या कार्यात एक वाक्यात किंवा स्पष्टता येते असलेल्यांचे प्रमाण ९५.३ टक्के आढळून आले आहे.
८. एका दिवसातील ८ तासात उत्तरपुस्तिका तपासण्याचे बंधन असणाऱ्यांचे प्रमाण ३१.८ टक्के आढळून आले आहे.
९. कॅप केंद्रावर तुम्हाला मिळणाऱ्या सुविधाबाबत आपणास समस्या जाणवल्या असलेल्यांचे प्रमाण ९.०० टक्के आढळून आले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

१०. प्रश्नपत्रिकेतील अध्ययनार्थीने अधिकच्या प्रश्नांची उत्तरे लिहितात याविषयी तुम्हास अडचणी येत असलेल्यांचे २८.४ टक्के प्रमाण आहे.
११. उत्तरपुस्तिकेतील बहुभाषिक उत्तरे तपासतांना काही अडचणी भेडसावत असणाऱ्यांचे प्रमाण १२.८ टक्के आढळून आले आहे.
१२. अध्ययनार्थीने लिहिलेल्या उत्तरे तपासण्याचे कार्य मी आनंदाने करतो असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण २२.७ टक्के आहे.
१३. अध्ययनार्थीने लिहिलेल्या उत्तरातील संपूर्ण आशय वाचणाऱ्यांचे प्रमाण ९६.७ टक्के इतके प्रमाण आढळून आले आहे.
१४. संगणकावर उत्तरे तपासतांना मला त्रास होत असणाऱ्यांमध्ये सहमत असलेल्यांचे प्रमाण ८.५ टक्के आढळून आले आहे.
१५. ८० गुणांची एक उत्तर पुस्तिका तपासण्यासाठी मला तीन मिनिटे वेळ पुरेसा असलेल्यांमध्ये असहमत १४.२ टक्के आढळून आले आहे.
१६. उत्तरे तपासण्यातील एक वाक्यता राहण्यासाठी विद्यापीठाने पुरविलेले संक्षिप्त उत्तर वाचतो व त्यानुसार गुणदान करणाऱ्यांमध्ये अतिसहमत असलेल्यांचे प्रमाण ९५.३ टक्के आढळून आले आहे.
१७. समीक्षकाने दिलेल्या सूचनांनुसार मी उत्तरे तपासऱ्यांमध्ये अतिसहमत असलेल्यांचे प्रमाण ९६.२ टक्के सहमत आढळून आले आहे.
१८. आर्थिक लाभ होण्यासाठी एका दिवसांत जास्तीत-जास्त उत्तर पुस्तिका मूल्यांकनामध्ये सहमत २५.१ टक्के, तटस्थ आढळून आले आहे.
१९. मानसिक आरोग्य चांगले असेल तेव्हाच मी उत्तरपुस्तिका तपासायला कॅप केंद्रावर येणाऱ्यांमध्ये सहमत ८०.०० टक्के आढळून आले आहे.
२०. विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उत्तरपुस्तिका तपासण्याचे काम करणाऱ्यामध्ये अतिसहमत असलेल्यांचे प्रमाण २१.३ टक्के आणि ७८.२ टक्के सहमत इतके प्रमाण आढळून आले आहे.
२१. माझ्या मनातील कौटुंबिक/सामाजिक कलहामुळे उत्तरपुस्तिका तपासण्यावर परिणाम होणाऱ्यांचे प्रमाण अतिसहमत असलेल्यांचे प्रमाण १६.१ टक्के आढळून आले आहे.
२२. अध्ययनार्थीच्या उत्तरातील अशुद्धलेखन व असमर्पक लेखन याविषयी लिहिलेल्या उतरानुसार मी गुणदान करणाऱ्यांचे प्रमाण ७४.९ टक्के सहमत असलेल्यांचे प्रमाण आढळून येते.
२३. विद्यापीठाने उत्तरपुस्तिका तपासणीसाठी ऑन स्क्रीन असेसमेंटची पद्धत कालानुरूप संयुक्तिक असलेल्यांमध्ये अतिसहमत असलेल्यांचे ८९.१ टक्के,समंत्रकाचे मत आढळून आले आहे.
२४. उत्तरपुस्तिका तपासण्याबाबत परीक्षक म्हणून झालेली नेमणूक मी गोपनीय ठेवणाऱ्यामध्ये अतिसहमत असलेल्यांचे प्रमाण ७५.५ टक्के, सहमत २०.४ टक्के इतके आढळून आले आहे.
२५. विद्यापीठ नियमानुसार एका दिवसांत उत्तरपुस्तिका तपासण्याची संख्याबाबतच्या नियमाचे बंधन ठेवणे योग्य नसणाऱ्यामध्ये सहमत असलेल्यांचे प्रमाण ४१.७ टक्के, इतके आढळून आले आहे.
२६. आपल्या शेजारचा परीक्षक जास्त वेगाने उत्तरे तपासतो म्हणून त्याप्रमाणे मी सुद्धा उत्तरे तपासणाऱ्यामध्ये असहमत ९१.५ टक्के इतके आढळून आले आहे.

**सारांश**

संशोधनातून असे स्पष्ट होते की तांत्रिक प्रगतीमुळे काही समस्या सुटल्या असल्या तरी नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषतः डिजिटल मूल्यांकनात इंटरनेट आणि स्कॅनिंग गुणवत्तेचा प्रभाव दिसून येतो. मानधनातील विलंबामुळे परीक्षक समिक्षकांची प्रेरणा कमी होते. तसेच मानसिक आरोग्याचा प्रभाव हे एक नवीन आणि महत्त्वाचे निरीक्षण आहे. मूल्यांकन करतेवेळेस संगणकाचा अति वापर झाल्याने माणसाला त्रास होतो. स्क्रीनवर उत्तरे फारच लहान असेल किंवा वाचनीय नसेल तर परीक्षकाच्या दृष्टीविषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे विद्यापीठाने स्कॅनिंग स्पष्ट दिसणारे याची कलगी घ्यावी.

उत्तरपत्रिका तपासणी ही शैक्षणिक व्यवस्थेचा कणा आहे. प्रस्तुत संशोधनातून असे दिसून आले की परीक्षक समिक्षकांना विविध प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणींचे योग्य व्यवस्थापन केल्यास मूल्यांकनाची गुणवत्ता सुधारता येईल. विशेषतः प्रशिक्षण, तांत्रिक सुधारणा आणि प्रशासकीय कार्यक्षमतेवर भर देणे आवश्यक आहे.

**समारोप (Conclusion)**

प्रस्तुत संशोधनातून उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेत परीक्षक आणि समीक्षकांना येणाऱ्या विविध अडचणींचे सखोल विश्लेषण करण्यात आले. अभ्यासातील निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की डिजिटल मूल्यांकन प्रणालीमुळे मूल्यांकनाची गती आणि पारदर्शकता वाढली असली तरी इंटरनेट कनेक्टिव्हिटी, लॉगिन समस्या, तसेच स्कॅनिंगची गुणवत्ता यांसारख्या तांत्रिक अडचणी अजूनही मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहेत. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांमधील अशुद्धलेखन, अस्पष्ट हस्ताक्षर आणि अपूर्ण उत्तरे यामुळे गुणांकन प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. मानधनाशी संबंधित अडचणी, विशेषतः मानधनातील विलंब आणि अपुरेपणा, हे परीक्षकांच्या कार्यप्रेरणेला बाधा आणणारे महत्त्वाचे घटक असल्याचेही आढळले. तसेच कार्यपरिस्थिती, वेळेचे बंधन आणि कॅप केंद्रातील सुविधा यांचा परीक्षकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याचे स्पष्ट झाले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

या संशोधनातील एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष म्हणजे परीक्षकांच्या मानसिक स्थितीचा मूल्यांकन प्रक्रियेवर होणारा प्रभाव. मानसिक ताण, थकवा आणि वैयक्तिक समस्या यांमुळे गुणांकनातील अचूकता आणि एकवाक्यता कमी होऊ शकते. त्यामुळे मूल्यांकन प्रक्रियेत मानवी घटकांचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. यावरून असे निष्कर्ष काढता येतात की, गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह मूल्यांकन सुनिश्चित करण्यासाठी तांत्रिक सुधारणा, प्रभावी प्रशिक्षण कार्यक्रम, योग्य कार्यपरिस्थिती आणि वेळेवर मानधन वितरण या बाबींवर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच परीक्षकांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सहाय्यक उपाययोजना करणेही आवश्यक आहे.

एकूणच, प्रस्तुत संशोधन शैक्षणिक मूल्यांकन प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शक ठरते. यामधून मिळालेले निष्कर्ष आणि शिफारशी शिक्षण संस्था, विद्यापीठे आणि धोरणनिर्माते यांच्यासाठी उपयुक्त ठरून मूल्यांकन प्रक्रियेला अधिक अचूक, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्यास मदत करतील.

**संदर्भ** (References)

1. Black, P., & Wiliam, D. (1998). Assessment and classroom learning. *Assessment in Education*, 5(1), 7–74.
2. Brown, G. T. L. (2004). Teachers' conceptions of assessment. *Assessment in Education*, 11(3), 305–325.
3. Nitko, A. J., & Brookhart, S. M. (2011). *Educational Assessment of Students*. Pearson.
4. Sadler, D. R. (1989). Formative assessment and instructional systems. *Instructional Science*, 18(2), 119–144.
5. University Grants Commission (UGC). (2020). Guidelines on Examination Reforms.
6. Maharashtra State Higher Education Reports (2022–2024).
7. Google Forms Survey Data (2026). Primary Data Source.
8. एक्लेस्टोन, के. (n.d.). उच्च शिक्षणातील मूल्यांकन.
9. एकलव्य. (n.d.). उत्तरपत्रिका मूल्यांकन आणि डिजिटल सोल्युशन्समध्ये गंभीर आव्हाने.